# असोसिएशन ऑफ कॉलेज ॲण्ड युनिर्व्हसिटी सुपर ॲन्युएटेड टीचर्स, महाराष्ट्र

## तृत्तीय वार्षिक सर्वसाधारण सभा, कार्यवृत्तांत वर्ष २०१२-१३

**दिनांक :- १८/१२/२०१३**

जळगांव येथे गतवर्षी आपल्या असोसिएशनची सर्वसाधारण सभा दिनांक १८/१२/२०१२ रोजी झाली होती. या बाबतचे इतिवृत्त मा.सचिव प्राचार्य मोहंमद शफी यांनी आपल्या समोर सादर केले आहे. त्यानंतर असोसिएशनने केलेल्या कार्याचा वृत्तांत दिनांक २८/११/२०१३ च्या कार्यकारणीच्या बैठकीत मान्य करण्यात आला असून तो आपल्या समोर सादर करीत आहे.

**कोल्हापूर विभाग शाखा भेट :-**

फेब्रुवारी ३ ते ६ /२०१३ या दरम्यान संस्थेचे अध्यक्ष डॉ.एम.ए. वाहूल, उपाध्यक्ष डॉ.जे.एम.मंत्री व कार्यकारी मंडळाचे स.सदस्य डॉ.पी.के. निकम यांनी कोल्हापूर विभागात कराड, सांगली व कोल्हापूर या ठिकाणी भेटी दिल्या, या सभेचा वृत्तांत.

**कराड बैठक :-**

दिनांक ०४/०२/२०१३ रोजी कराड येथे सकाळी बैठक घेण्यात आली या बैठकीचे प्रास्ताविक कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष डॉ. मानसिंगराव जगताप यांनी केले तर उपाध्यक्ष डॉ. चौगुले जे.बी. यांनी जळगांव येथे झालेल्या दुस-या वार्षिक सभेचा वृत्तांत सभासदां समोर मांडला या प्रसंगी खालील सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.डॉ. घारपुरे व्ही.टी.,

प्रा.आर.एन. जाधव, प्रा.के.बी. धांडे, प्राचार्य डी.व्ही. पाटील, प्राचार्य कुरहाडे पी.टी., प्राचार्य रहणार, प्राचार्य गायकवाड आर.डी. सातारा यांनी कुंठीत वेतन वाढी बाबत, सहाव्या वेतन आयोगातील उपदान वाढी बाबत असोसिएशनने केलेल्या यशस्वी कामाची प्रशंसा केली. व हयाच बरोबर ६ व्या वेतन आयोगामध्ये सेवा निवृत्ती वेतन निर्धारणाच्या कमीत कमी ५० टक्के वेतन मिळणे आवश्यक आहे या बाबत असोसिएशनने लवकर पावले उचलावित असे नमूद केले व वाढत्या वयोमानानुसार वैद्यकीय खर्च जास्त होतो त्याबाबतचा खर्च शासनाने द्यावा असे मनोगत व्यक्त केले.

मा.अध्यक्ष डॉ.एम.ए. वाहूळ यांनी अध्यक्षीय समारोप केल्यावर बैठक संपली या बैठकीस सातारा जिल्हयातील ३५ सदस्य उपस्थित होते. बैठकीचे आयोजन प्राचार्य डॉ. घारपुरे व्ही.टी. यांनी एम.जी.एम. महाविद्यालयात उत्तमरित्या केले होते.

**सांगली जिल्हा बैठक :-**

दिनांक ०४/०२/२०१३ सायंकाळी स्थान श्रीमती नथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली संयोजक प्राचार्य डॉ.चौगुले जे.बी. (उपाध्यक्ष कोल्हापूर विद्यापीठ शाखा) उपस्थिती ४१

प्रास्ताविक डॉ. चौगुले जे.बी. (उपाध्यक्ष कोल्हापूर विभाग) यांनी केले त्यांनी पेन्शन पुर्ननिधारण, कुंठीत वेतनवाढ व सभासद संख्या वाद या बाबत बैठकीत माहिती दिली. प्राचार्य मानसिंगराव जगताप (अध्यक्ष कोल्हापूर विभाग) यांनी जळगावच्या सर्वसाधारण बैठकीचा वृत्तांत सादर केला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सोहनी पी.व्ही. प्रा.अरुण गवळी, प्रा. खाडीलकर सी.सी. डॉ. आय.आर.द्रांक्षी, श्रीमती उपाध्ये व्ही.व्ही. यांनी ५ व्या वेतन आयोगातील उपदान २ १/२ चे ३ १/२ लाख मिळणे बाबत, असोसिएशनने कार्यवाही करावी हा प्रश्न उपस्थित केला. तसेच

पी.एचडी. वेतनवाढ व कुंठीत वाढीबाबत सदस्यांच्या अडचणी मांडल्या. मा.अध्यक्षांनी ५ व्या वेतन आयोगामध्ये उपदान २.५ लाखाचा ३.५ लाख दिल्याचा कुठलाच सबळ पुरावा नसल्यामुळे सदर याचिका करता येणार नाही याची माहिती दिली. संघटना करीत असलेल्या ईतर प्रयत्नांची माहिती देवून अध्यक्षीय समारोप केला.

**कोल्हापूर जिल्हा बैठक :-**

दिनांक ०५/०२/२०१३ उपस्थिती ३९ संयोजक मानसिंगराव जगताप अध्यक्ष कोल्हापूर विद्यापीठ विभाग. स्थळ - कमला कॉलेज राजाराम पुरी या बैठकीत प्राचार्य अशोक जगताप यांनी डीसेंबर मध्ये जळगाव येथे घेतलेल्या द्वित्तीय सर्वसाधारण सभेचा अहवाल सादर केला. या प्रसंगी डॉ. उपाध्ये, डॉ. सौ. कुरणे, श्री. पी.डब्ल्यु. देशमुख, डॉ.सी.टी.पवार, प्राचार्य अडसुळ, श्री. डी.यु.पवार यांनी आप आपले विचार व्यक्त केले. डॉ.पी.के. निकम यांनी पी.एचडी. वेतनवाढीच्या बाबत असोसिएशनने केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर केली, प्राचार्य डॉ. जे.एम.मंत्री यांनी उपदान प्रकरणी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयीन निकालाबाबतची माहिती दिली.

डॉ.एम.ए.वाहूळ यांनी वेतन पुर्ननिधारणा बाबत असोसिएशन करीत असलेल्या कार्यवाहीची माहिती देवून अध्यक्षीय समारोप केला.

दि.१७/०२/२०१३ च्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत महाराष्ट्रातून सदस्यांची मागणी पहाता पुन्हा कुंठीत वेतनवाढ प्रकरणी ६ वी याचिका दाखल करणे संबंधीचा निर्णय घेण्यात आला.

तसेच महाराष्ट्रातील दुष्काळ लक्षात घेवून मा.अध्यक्षांनी दुष्काळास आपला एक दिवसाचा निवृत्ती निधी वेतन अथवा सदस्यांनी व्यक्तीश यथायोग्य निधी देण्याचे आवाहन केले त्यास अनेक सदस्यांनी प्रतिसाद दिला.

## पुणे विद्यापीठ विभागा अंतर्गत नासिक बैठक

दिनांक १३/०२/२०१३ स्थळ - मराठा विद्या प्रसारक द्वारा संचलित कॉमर्स, मॅनेजमेन्ट कॉम्प्युटर सायन्स, महाविद्यालय नासिक येथे दुपारी ठिक २.०० वाजता.

कार्यकारणी सदस्य सहभाग

१) डॉ. एम.ए.वाहूळ (अध्यक्ष) २) डॉ.जे.एम. मंत्री (उपाध्यक्ष)

संयोजक :- डॉ. जाचक एम.एन. विभागीय अध्यक्ष डॉ. ग़ायकवाड एम.जी. विभागीय सचिव

असोसिएशनने हाती घेतलेल्या कामाची माहिती दिली. विभागातील सदस्य संख्या वाढविणेचे दृष्टीने व संघटना मजबुत करणेचे दृष्टीने अध्यक्षांनी या प्रसंगी मार्गदर्शन केले.

**संगमनेर बैठक :-**

दिनांक १३/०२/२०१३ आयोजन प्रा.देवचक्के एच.आर. (सह सचिव पुणे विभाग)

स्थळ - प्रसाद कॅफे हॉल उपस्थिती ११ सदस्य

या प्रसंगी सन्मानीय सदस्यांनी अर्जित रजेच्या रोखीकरणाचा प्रश्न व ईतर अडचणी मांडल्या त्या सोडविणे बाबत मा.अध्यक्षांनी या बैठकीत मार्गदर्शन केले.

**कार्यकारणी बैठक :-**

दिनांक १६/०९/२०१३ आयोजन - औरंगाबाद

हॉटेल नैवद्य दिनांक १८ डिसेंबर २०१३ रोजी नासिक येथे होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका तयार करणेवर चर्चा करण्यात येवून कार्यक्रमाची संपूर्ण रुपरेषा ठरविण्यात आली.

या प्रसंगी एक स्मरणिका प्रसिध्द करण्याचे ठरविण्यात आले. त्या संबंधीचा आराखडा तयार करण्यात आला. व त्याचे प्रमुख संपादक म्हणून डॉ.ए.बी.पाटील जळगांव यांच्यावर हि सोपविण्यात आले. त्यांना सहकार्य करणेस विद्यापीठ निहाय एक सदस्य प्रत्येक विभागाने सुचवावा असे ठरविण्यात आले.

**धुळे जिल्हा बैठक :-**

दिनांक २८/०९/२०१३ आयोजन - श्री.शिवाजीराव सावंत (अध्यक्ष धुळे जिल्हा)

स्थळ - झुलाल भिकाजीराव पाटील महाविद्यालय देवपूर धुळे उपस्थिती - ४५

कार्यकारणी सदस्य - डॉ. एम.ए.वाहूळ (अध्यक्ष), डॉ. जे.एम. मंत्री (उपाध्यक्ष)
प्रा.एस.बी नाफाडे (कोषाध्यक्ष), प्राचार्य आर.डी.राणे (स.सदस्य)

विशेष उपस्थिती - प्रा.येवले एम.के., प्रा.पी.बी.पाटील (जळगांव)

१) या बैठकीत कुंठीत वेतनवाढ व उपदान सबंधी याचिका अहवालाची माहिती प्राचार्य डॉ.जे.एम.मंत्री यांनी दिली.

२) प्रा.एस.बी.नाफाडे यांनी सहाव्या वेतन आयोगामध्ये सेवानिवृत्ती वेतन ठरवितांना कायद्या प्रमाणे ५० टक्के सेवा निवृत्तीवेतन मिळणे कसे आवश्यक आहे व सदर वेतन महाराष्ट्र शासनाने दिले नाही याबाबत पत्र व्यवहार करुनही शासनाने लक्ष दिले नाही म्हणून याचिका दाखल करणेच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती दिली.

३) प्राचार्य डॉ.आर.डी.राणे पुणे व जळगांव विद्यापीठातील कायदा अंतर्गत कलम ४२४ (३) अे.बी.सी. ची माहिती देवून अर्जित रजेच्या रोखीकरणाचा लाभ सदस्यांनी कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन केले.

त्यानंतर झालेल्या चर्चेत प्रा.डी.व्ही. खंदळे, प्रा.डॉ. एच.ए.पाटील, प्रा.एम.बी.हातेकर यांनी सहभाग घेतला. मा.अध्यक्षांनी सदस्यांना विचारलेल्या प्रश्नांना सर्मपक उत्तरे देवून रिव्हीजन ऑफ पेन्शन सहाव्या वेतन आयोगात कसे आवश्यक आहे या संबंधी संपूर्ण माहिती दिली व भावी काळात वयानुसार वाढीव निवृत्तीवेतन वैद्यकीय प्रतिपुर्तीसंबंधी शासनाचे सहकारी मिळावे संबंधी कार्यवाही करण्याचा मनोदय व्यक्त केला.

**नासिक बैठक :-**

दिनांक - २९/०९/२०१३ स्थळ - मराठा विद्या प्रसारक मंडळद्वारा संचलित वाणिज्य व्यवस्थापन आणि संगणकशास्त्र महाविद्यालय नासिक उपस्थिती ५५

संयोजक - डॉ.जाचक एम.एन. (विभागीय अध्यक्ष) व डॉ.गायकवाड एम.जी. (विभागीय सचिव)

१) पुणे विद्यापीठ शाखेतील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या बैठकीसाठी असोसिएशनच्या केंद्रीय शाखेच्या वतीने अध्यक्ष डॉ. एम.ए.वाहूळ, उपाध्यक्ष डॉ.जे.एम.मंत्री कोषाध्यक्ष प्रा.एस.बी. नाफडे हे उपस्थित होते.

२) पुणे विद्यापीठ शाखा अध्यक्ष यांनी प्रास्ताविक करुन केंद्रीय कार्यकारणी सदस्यांचे स्वागत केले.

३) प्राचार्य एम.जी.गायकवाड पुणे विद्यापीठ शाखेचे सचिव यांनी पुणे विद्यापीठ शाखेचा मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर करुन सभेची मान्यता घेतली.

४) विभागीय शाखेचे कोषाध्यक्ष प्रा.के.के. हरक यांनी २०१२-२०१३ चा जमा खर्चाचा अहवाल सादर केला व सभेने तो मान्य केला.

५) विभागीय सह सचिव प्रा.एच.आर.देवचक्के यांनी १८/१२/२०१३ रोजी नाशिक येथे होणा-या मध्यवर्ती संघटनेच्या सर्वसाधारण सभेविषयी सविस्तर माहिती दिली व वरील सभेसाठी होणार या संभाव्य खर्चाची माहिती देवून संभाव्य निधी जमा करण्याचे आवाहन सदस्यास केले त्यास सभासदांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

६) डॉ.जे.एम.मंत्री यांनी सेवा उपदान याचिका व पीएच.डी. वेतनवाढ संबंधी न्यायालयीन याचिका व त्याच्या अंमलबजावणीसाठी कराव्या लागणा-या अवमान याचिका सद्यस्थितीची माहिती दिली.

७) प्रा.एस.बी.नाफडे यांनी दिनांक ०१/०१/२००६ पुर्वीच्या सुधारित वेतन संबंधी न्यायालयीन याचिके संबंधी संपूर्ण माहिती दिली त्यानंतर झालेल्या चर्चेत प्रा.के.एस. खैरनार, प्रा.एस.टी. मोरे, प्रा.बी.एस.आहेर, प्रा.बेरा, प्रा.टी.बी.अहिरे, प्रा.एस.एम.वाघ, श्रीमती मिता प्रा.गावले, प्रा.के.के. यादव यांनी सहभाग घेतला.

अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ यांनी सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देवून अध्यक्षीय समारोप केला.

प्राध्यापिका श्रीमती खानोलकर यांनी कुंठीत वेतनवाढीच्या रक्कमा १२ टक्के व्याजासहीत ज्या सन्मानीय सदस्यांना मिळाल्या त्यांनी मध्यवर्ती संघटनेस काही रक्कम देणगी स्वरुपात देवून सहकार्य करावे असे आवाहन केले हया नुसार खालील सदस्यांनी प्रत्येकी ५०००/- रुपये संघटनेस देणगी स्वरुपात देण्याचे जाहीर केले.

डॉ. मधुकर जाचक, डॉ. एम.जी.गायकवाड डॉ.बी.एम.देवरे, प्रा.बी.बी. पगार, डॉ.आर.आर. बेराड, डॉ.बी.बी.रायते, डॉ. एम.ए.बारगजे, प्रा.एच.आर. देवचक्के व आर्थिक लाभ न घेताही प्रा.के.के. यादव यांनी त्वरीत प्रतिसाद देवून रुपये ५०००/- चा धनादेश देणगी स्वरुपात संघटनेस दिला हे विशेष होय. डॉ. बी.एम. आहेर यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर सभा समाप्त झाली.

**नांदेड विद्यापीठ शाखा उदगीर बैठक :-**

दिनांक २८/१०/२०१३ उपस्थिती ३१

संयोजक - प्रा.गुळंगे बी.एस., प्रा.मोरे डी.एस.

स्थळ :- उदयगिरी महाविद्यालय उदगीर :- कार्यकारणी सहभाग- अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ उपाध्यक्ष डॉ. जे.एम.मंत्री, कोषाध्यक्ष प्रा.एस.बी.नाफडे, सन्माननीय सदस्य प्रा.डॉ. एम.डी.जहागिरदार.

बैठकीचे प्रास्ताविक डॉ.व्ही.डी.देशपांडे यांनी केले. डॉ.एम.डी. जहागिरदार यांनी वेतन पुर्नरचना संबंधी तर प्रा.एस.बी. नाफडे यांनी कुंठीत वेतनवाढ संबंधी असोसिएशन ने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली प्राचार्य डॉ.जे.एम.मंत्री यांनी पीएच.डी. वेतनवाढ व उपदान संबंधी केलेल्या कार्यवाहीच्या वृत्तांत सादर केला यानंतर झालेल्या चर्चेत प्रा.धावरे ए.एस., प्रा.डी.एस.मोरे, प्रा.मनोहर मेटुळे यांनी सहभाग घेतला. त्यांनी वैद्यकीय प्रतिपुर्ती व प्रवास सवलत सेवा निवृत्तांना मिळणे बाबत प्रश्न उपस्थित केले. अध्यक्ष एम.ए.वाहूळ यांनी सर्व उपस्थित प्रश्नांचा आढावा घेऊन समारोप केला.

लातूर बैठक

दिनांक २९/१०/२०१३ संयोजक डॉ. सुदर्शन मोरे, प्रा.विठ्ठल मोरे

स्थळ :-राजश्री शाहू महाविद्यालय लातूर, उपस्थिती ३४

या बैठकीचे प्रस्ताविक डॉ.सुदर्शन मोरे यांनी केले डॉ. एम.डी.जहागिरदार यांनी रिवीजन ऑफ पेन्शन, प्राचार्य डॉ.जे.एम.मंत्री यांनी पीएच.डी. वेतनवाढ प्रा.एस.बी.नाफडे यांनी कुंठीत वेतनवाढ या बाबत असोसिएशन करीत असलेल्या कामाची माहिती दिली या प्रसंगी प्रा.डॉ. विठ्ठल मोरे, प्राचार्य कावळे, प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, प्राचार्य मोटे यांनी आपले विचार व्यक्त करुन संघटना मजबुत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर झालेल्या चर्चेत प्राचार्य गायकवाड प्रा.सांगवे, प्रा.दत्ता सोमवंशी, प्रा.सोनी आर.आर. आदिंनी सहभाग घेतला.

अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ यांनी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती देवून अध्यक्षीय समारोप केला.

## वर्ष २०१२-१३ ची न्यायालयीन प्रकरणा संबंधी माहिती.

कार्यकारी मंडळाची दिनांक १०/०३/२०१३ रोजी महसुल प्रबोधीनी औरंगाबाद येथे एक महत्वाची बैठक घेण्यात आली. ५ व्या वेतन आयोगातील सेवानिवृत्त प्राध्यापक, प्राचार्यांना लाभ देतांना राज्याने हकीम समितीच्या शिफारशी प्रमाणे ४०% वाढ देऊन ६ व्या वेतन आयोगामध्ये वेतनाचे निश्चितीकरण दिनांक ०१/०१/२००६ पासून दिलेले आहे. वास्तविक पहाता दिनांक १५/१२/९९ च्या शासन परिपत्रकाप्रमाणे वेतन निश्चिती करितांना नवीन वेतन श्रेणीमध्ये समकक्ष वेतन श्रेणीच्या कमीत कमी ५०% वेतनावर निश्चितीकरण करणे आवश्यक होते यावर चर्चा करणेसाठी ही बैठक घेण्यात आली. या बैठकीस सर्व विद्यापीठ शाखांच्या प्रतिनिधींना देखील बोलावण्यात आले होते.

या विषया बाबत सविस्तर व अभ्यासपुर्ण माहिती प्राचार्य डॉ.एस.बी. अदवंत यांनी मांडली.डॉ. एम.डी.जहागिरदार यांनी या बाबत शासनाशी केलेले पत्र व्यवहार व संपर्कासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. शासन प्रतिसाद देत नसल्यामुळे यासंबंधी याचिका उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल करणे योग्य राहील असे मत व्यक्त केले याचिका दाखल करणेस ३२५ सदस्यांनी सहमती दिल्याचीही माहिती दिली.

प्राचार्य आर.डी.राणे, जळगांव यांनी पेन्शनच्या १९८२ च्या नियमात कुठलीच सुधारणा नसल्यामुळे या बाबत न्यायालयात जाणेच योग्य राहील असे मत व्यक्त केले. त्यास प्राचार्य व.ना.इंगळे बार्शी, प्राचार्य मानसिंगराव जगताप कोल्हापूर, प्राचार्य डॉ.एम.जी. गायकवाड, नासिक, प्रा.एस.बी.नाफडे औरंगाबाद यांनी अनुमोदन दिले.मा.अध्यक्षांनी सर्व सदस्यांना मत व्यक्त करण्याचे आवाहन केले. सर्वांनी याचिका दाखल करण्यास एकमताने सहमती दिल्यानंतर वेतन पुनर्निधारणासाठी उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला.

त्याप्रमाणे सदर याचिका क्र.४२९२/ २०१३ दाखल केलेली आहे. याबाबत शासनास त्यांचे म्हणणे दाखल करणे संबंधीत खंडपीठाने डिसेंबर सुटयानंतर दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**कुंठीत वेतनवाढ :-**

मागील वर्षीच्या सर्वसाधारण सभेत कुंठीत वेतनवाढ संबंधी पाचवी याचिका क्र.६५१६ वर्ष २०१२ ची प्रलंबित असण्याची माहिती दिली होती. त्या नंतर विविध विद्यापीठ शाखेतून कुंठीत वेतनवाढी संबंधी आपल्या सदस्यांना लाभ मिळाला नाही म्हणून आणखी एक अंतिम याचिका असोसिएशनने दाखल करावी अशी अग्रही मागणी होवू लागली म्हणून सर्व विभागाची एकत्र याचिकाकर्त्याची माहिती घेवून ६ वी याचिका दिनांक २६/०६/२०१३ रोजी दाखल करण्यात आली. याचिका क्र.५३५८/२०१२ एकूण याचिकाकर्ते ८३ वरील दोन्ही याचिकांचा निकाल दिनांक ०१/१०/२०१३ रोजी आपल्या बाजुने लागला आहे. याबाबत शासनाने कुंठीत

वेतन वाढीची रक्कम दिलेल्या मुदतीत न दिल्यास तसेच मागचा अनुभव लक्षात घेता या संबंधी अवमान याचिकाच आपणास दाखल करावी लागेल असे नमुद करावेसे वाटते. आणखी काही सन्माननीय सदस्य कुंठीत वेतनवाढीचा लाभ घेण्यास इच्छुक असल्याचे समजते याबाबत याचिका दाखल करण्याचा विचार करावा लागेल.

**सेवा उपदान (ग्रॅच्युईटी ) याचिका :-**

सहाव्या वेतन आयोगात दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०८/२००९ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्यांना शासनाने ग्रॅच्युईटी रुपये ५ लाख दिली मात्र दिनांक ०१/०९/२००९ नंतर सेवानिवृत्त झालेल्यांना ७ लाख रुपये ग्रॅच्युईटी ची रक्कम देण्यात आली. एकाच वेतन आयोगात आधी सेवानिवृत्त झालेल्यांना कमी उपदान व नंतर सेवानिवृत्ती झालेल्यांना जास्त रक्कम हा भेदभाव केला. म्हणून आपण या संबंधी याचिका उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केली होती हा निकाल आपल्या विरोधात गेल्यामुळे आपणांस सर्वोच्च न्यायालयात जावे लागले. सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र.३७००/२०१२ या संबंधीची माहिती मागील वर्षीच्या सभेत देण्यात आली होती. सदरचा निकाल दिनांक ३०/०१/२०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या बाजुने दिला व संबंधीत याचिकाधारकास २ लाख रुपयांच्या फरकाची रक्कम ३ महिन्यात देण्याचे आदेश शासनास दिले होते. मात्र शासनाने दिलेल्या मुदतीत कुठलीच कार्यवाही केली नाही म्हणून आपणांस या बाबत देखील सदर कोर्टासमोरच अवमान याचिका दाखल करावी लागली ज्यासाठी आपले वकील ॲड.बारहाते युवराज, ॲड. अमोल सुर्यवंशी व मा.अध्यक्ष वाहुळ एम.ए. यांनी धावपळ करुन शासनास नोटीस बजावली ज्याची सुनावणी दिनांक १९/१०/२०१३ रोजी व नंतर दिनांक २६/११/२०१३ झाली व शासनास या संबंधी अंतिम कार्यवाही कशी कराल याचा तपशील दिनांक १६/१२/२०१३ रोजी दाखल करण्याचे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

**पीएच.डी.वेतनवाढ संबंधी :-**

१९८६ पुर्वी सेवानिवृत्त झालेल्या पीएच.डी. धारक प्राध्यापकांना ३ वेतन वाढीचा लाभ देण्यात यावा या संबंधीची याचिका क्र.१०२१५, २५ ऑक्टोंबर २०१२ (याचिकाकर्ते २५) व

दिनांक ०१/०१/१९९६ पासून पीएच.डी. धारकांना दोन वेतन वाढी द्याव्यात त्या संबंधीची याचिका क्र.१०४३१ दिनांक १८/१०/२०१२ (याचिकाकर्ते १०१) उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्ये सध्या प्रलंबित आहेत.

**४ थ्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तधारकांना ६ व्या वेतन आयोगात सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ मिळणे बाबत. :-**

४ थ्या वेतन आयोगामध्ये सेवानिवृत्त झालेल्या प्राचार्य व प्राध्यपकांना दिनांक १५/१२/१९९९ च्या शासन परिपत्रका प्रमाणे या प्राध्यापकांना ५ व्या वेतन आयोगात वेतन निश्चित करतांना समकक्ष वेतन श्रेणीच्या ५०% वेतनावर वेतन निश्चित करण्यात आले होते त्या प्राध्यापकांना ६ व्या वेतन आयोगामध्ये तशाच पध्दतीचा लाभ देण्यात यावा या संबंधी शासनाशी पत्र व्यवहार केला आहे मात्र शासनाने त्यांची कुठलीच दखल घेतली नाही त्या सदस्यांची आग्रही मागणी व त्यांचे वय लक्षात घेवून असोसिएशनने ही याचिका दाखल करण्याचे ठरविले आहे. सदर याचिकेचा मसुदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

एकूण न्यायालयीन प्रकरणाचा आढावा संबंधी माहिती संलग्न तक्त्यात दिलेली आहे.

धन्यवाद !

प्राचार्य डॉ.जे.एम.मंत्री
उपाध्यक्ष

## असोसिएशन ऑफ कॉलेज ॲण्ड युनिव्हर्सिटी
## सुपर ॲन्युएटेड टीचर्स, महाराष्ट्र

### न्यायालयीन प्रकरणे

**अ) कुंठीत वेतनवाढ :- ६ वा वेतन आयोग**

| अ.क्र. | याचिका क्र. | याचिकाकर्ते | दाखल दिनांक | निकाल दिनांक | न्यायालय | निकालाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९०५४/२०१० | ५८ | ०६.०९.२०१० | २२.०८.२०११ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| २ | २८६८/०११ | १५ | २१.०३.२०११ | २२.०८.२०११ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| ३ | ७८३८/२०११ | ७५ | २६.०९.२०११ | ०४.०७.२०१२ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| ४ | ९३०४/२०११ | ६५ | २८.११.२०११ | ०१.०२.२०१२ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| ५ | ६५१६/२०१२ | ९४ | ३१.०७.२०१२ | ०१.१०.२०१३ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| ६ | ५३५८/२०१२ | ८३ | २६.०६.२०१३ | ०१.१०.२०१३ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |

**ब) अवमान याचिका**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | कुंठीत वेतनवाढ याचिका क्र.९०५४ साठी | ५१८/२०११ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| ८ | कुंठीत वेतनवाढ याचिका क्र.२८३८ साठी | ५१९/२०११ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| ९ | कुंठीत वेतनवाढ याचिका क्र.९३०४ साठी | ४८४/२०१२ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |
| १० | कुंठीत वेतनवाढ याचिका क्र.७८३८ साठी | ५१८/२०१२ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या बाजुने |

क) कॅव्हेट

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | कुंठीत वेतनवाढ याचिका क्र.९०५४ आणि २८६८ साठी दि.०२.११.२०११ | सुप्रिम कोर्ट | |
| १२ | कुंठीत वेतनवाढ :- औरंगाबाद खंडपीठाच्या निकाला विरोधात महाराष्ट्र शासनाच्या याचिका :- एसएलपी क्र.८३९९/२०१२ आणि ८४००/२०१२ : फेटाळया | सुप्रिम कोर्ट | आपल्या बाजुने |

ड) ग्रॅच्युईटी - ६ वेतन आयोग.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ५२८४/२०११ | १२९ | १०.०६.२०११ | २६.०९.२०११ | औरंगाबाद खंडपीठ | आपल्या विरोधात |
| १४ | ३७००/२०१२ | १२९ | ०५.१२.२०११ | ३०.०१.२०१३ | एसएलपी सुप्रिम कोर्ट | आपल्या बाजुने |
| १५ | अवमान याचिका क्र.३७००/२०१३ साठी | | | ३०७/२०१३ | सुप्रिम कोर्ट | न्याय प्रविष्ठ |

**इ) पीएच.डी.२ आणि ३ वेतनवाढी**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १०२१५/२०१२ | २५ | ऑक्टो.२०१२ | | औरंगाबाद खंडपीठ | न्याय प्रविष्ठ |
| १७ | १०४३१/२०१२ | १०१ | १८.१०.२०१२ | | औरंगाबाद खंडपीठ | न्याय प्रविष्ठ |

**ई) सेवानिवृत्ती वेतन सुधारणा - ५ वा वेतन आयोग**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | ४२९२/२०१३ | ३२५ | ०३/०४/२०१३ | | औरंगाबाद खंडपीठ | न्याय प्रविष्ठ |
| १९ | ४ थ्या वेतन आयोगातील सेवानिवृत्तांना ६ व्या वेतन आयोगात सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ मिळण्यासाठी - याचिकेचे काम प्रगती पथावर. | | | | | |

(दिनांक :- ०७/१०/२०१३ पर्यंतचा अहवाल )